नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/03/2024 (शुक्रवार) दुपार

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण ४६,०७९००/- रूपयाचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक ०८/०३/२०२४ राजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे कुही हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, १६ चक्का एलपी वाहनामध्ये अवैधरित्या विनापरवाना रेती लोड करून पवनी भंडारा कडुन नागपुर मार्गे जाणार आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा कुही हद्दीतील मेन रोडवरील चांपा टोल नाका येथे रोडवर थांबुन अवैध रेती सबंधाने नाकाबंदी करीत असताना टाटा कंपनीची १६ चक्का एल.पी वाहन क्र. एम.एच–२७/डीपी–१९१९ आढळुन आले. स्टाफने वाहनास थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे १५ ब्रास रेती ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून वाहन क्र. एम.एच–२७/डीपी–१९१९ किंमती ४५,००,०००/–रू. मध्ये १५ ब्रास रेती किंमती ७५,०००/–रू. मोबाईल किमती ५०००/–रू. नगदी २७,९००/– रू. असा एकुण ४६,०७९००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे– सय्यद मोबीन वल्द सय्यद अलीमोद्दीन** (वाहन क्र. एम.एच–२७/डीपी–१९१९ चा चालक) २) **अब्दुल दानिश वल्द अब्दुल रहमान, वय २१ वर्ष, रा. गुलीस्ता नगर, अमरावती** हे **मालक नामे–३) प्रसाद चक्रधर भुगुल, रा. कॉटन ग्रीन नं. २, वीएमवी रोड अमरावती** यांचे सांगणे प्रमाणे विनापरवाना रेती चोरी करून वाहतूक करताना मिळून आले. असे एकुण ०३ आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे कुही येथे कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. कुही येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमित पांडे, पोलीस हवालदार ललीत उईके, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, शुभम मोरोकार विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

**पोस्टे कळमेश्वर :–** अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा मौजा पारडी देशमूख चौक येथे फिर्यादी नामे– उत्तम तूकारामजी राऊत  वय ७० वर्ष रा. पारडी देशमूख ता. कळमश्वेर यांचा मूलगा जखमी नामे भालचंद्र उत्तम राऊत वय ३८ वर्ष रा. पारडी देशमूख ता. कळमेश्वर याला आरोपी नामे– मनोज नागोराव चौधरी वय ४१ वर्ष रा.पारडी देशमूख ता. कळमेश्वर याने उधारीचे बाकी असलेले २००० रूपयाचे कारणावरून झगडा भांडण करून पोटावर चाकूने मारून गंभीर जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीचा पूतण्या वैभव राऊत व अभिषेक राऊत यांनी उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथे आणले तेथून त्याला रेफर केल्याने मेडिकल कॉलेज नागपूर येथे नेवून भरती केले व तेथे त्याचा उपचार सूरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कळमेश्वर येथे कलम ३०७ भांदवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास कळमेश्वर पोलीस करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**